**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः10.10.2023** **वारः मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

• राज्यात आरोग्य यंत्रणेचा संपूर्ण कायापालट करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

• परळी वैजनाथ, घृष्णेश्वर आणि सप्तशृंगगड या तीर्थक्षेत्रांच्या - 531 कोटींच्या सुधारित आराखड्याला मान्यता

• देशातील सर्व आयुर्विज्ञान संस्थांमध्ये, समर्पित आयुष अकादमी सुरू होणार

आणि

• मध्य प्रदेश, राजस्थानसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर

**व्हिजन 2035**

राज्यातील आरोग्य यंत्रणेचा संपूर्ण कायापालट करण्याकरता - सार्वजनिक आरोग्यावरील खर्च दुप्पट करणे, सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधांयुक्त सुसज्ज रुग्णालयं उभारणे तसंच ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी युद्धपातळीवर पावलं टाकण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिले. राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत मंत्रालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे देखील उपस्थित होते.राज्यातील 34 जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधायुक्त जिल्हा रुग्णालये उभारण्याबाबत सचिवांच्या समितीनं येत्या पंधरा दिवसांत आराखडा तयार करावा; तसंच 2035 पर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाचा विचार करून आरोग्याचा सर्वंकष आराखडा तयार करण्यासाठी- तज्ज्ञांची समिती नेमण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी काल दिले.याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांनी औषधं आणि उपकरणांची तत्काळ खरेदी करावी; जिल्हा रुग्णालयं अद्ययावत करावीत ; 25 जिल्ह्यांमध्ये नवीन अद्ययावत आणि सर्व सुविधा असलेली जिल्हा रुग्णालयं उभारावीत ; ग्रामीण भागात टेलि-मेडिसिन यंत्रणा उभी करावी; स्वच्छता, पिण्याचं पाणी यावर भर द्यावा आणि डासांचा प्रादुर्भाव रोखावा - अशा विविध विषयांवर मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधितांना सूचना दिल्या.

## तीर्थक्षेत्र

परळी वैजनाथ, घृष्णेश्वर आणि सप्तशृंगगड या तीर्थक्षेत्रांच्या - 531 कोटीं रुपयांच्या सुधारित आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची काल बैठक झाली; त्यात हा निर्णय घेण्यात आला. यात परळी वैजनाथ ज्योर्तिलिंग क्षेत्र विकासासाठी 286 कोटी 68 लाख; घृष्णेश्वर तीर्थक्षेत्रासाठी 163 कोटी आणि सप्तशृंगी देवी या तीर्थक्षेत्राच्या 81 कोटी 86 लाख रुपयांच्या - सुधारित आराखड्याला मान्यता देण्यात आली. तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयीसुविधा द्याव्यात आणि परिसरात पर्यटनवाढीसाठी प्रयत्न करावेत असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## आयुष

आगामी काळात देशातील सर्व एम्स- अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थांमध्ये; समर्पित आयुष अकादमी तयार करण्याची घोषणा केंद्रीय आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केली. ते काल मुंबईमध्ये राष्ट्रीय आयुष अभियानाच्या प्रादेशिक आढावा बैठकीत बोलत होते. आरोग्य सेवा प्रणालीच्या सर्व स्तरांवर लोकांना आधुनिक आणि पारंपरिक अशा दोन्ही प्रकारच्या आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं सोनोवाल म्हणाले. कोविड काळात आयुष प्रणालीने दिलेल्या योगदानामुळे जगभर - आयुष योजनेला ओळख मिळाली आहे. भारतात पारंपरिक औषध क्षेत्रात एका युनिकॉर्न कंपनीसह 900 हून अधिक स्टार्ट अप सुरू असल्याची माहिती सोनोबाल यांनी यावेळी दिली. या आढावा बैठकीला महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, गोवा, अंदमान आणि निकोबार बेटे, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीवचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## निवडणूक

निवडणूक आयोगानं काल पाच राज्यांच्या निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर केलं. मिझोराम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तेलंगण मध्ये 7 ते 30 नोव्हेंबर दरम्यान विविध टप्प्यात विधानसभा निवडणुका होतील. या पाचही राज्यांची मतमोजणी 3 डिसेंबर रोजी होणार आहे. मिझोराममध्ये 7 नोव्हेंबर रोजी तर छत्तीसगडमध्ये 7 आणि 17 नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान होणार आहे. तसंच मध्य प्रदेशात 17 नोव्हेंबरला, राजस्थानमध्ये 23 नोव्हेंबरला आणि तेलंगण विधानसभेसाठी 30 नोव्हेंबरला मतदान होणार आहे.2024 च्या लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी या विधानसभा निवडणुका होणार असल्यामुळे या पाच राज्यांतील निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचं - मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना सांगितलं .

या पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या 679 जागा आहेत; या राज्यात 16 कोटी मतदार असून सुमारे 60 लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत.

**सर्वोच्च न्यायालय**

आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर येत्या शुक्रवारी - सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी होणार आहे. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करणारी याचिका शरद पवार गटाकडून जयंत पाटील यांनी सादर केली. त्यावर काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली; तेव्हा न्यायालयानं हे आदेश दिल्याची माहिती शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं , विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावली आहे.दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीसंदर्भात आणि पक्षावरील हक्कासंबंधी, निवडणूक आयोगाच्या कार्यालयात काल सुनावणी झाली. यात अजित पवार यांच्या गटानं आपली भूमिका मांडली. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लोकशाहीचं पालन झालं नाही; पक्षाच्या गेल्यावर्षी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात तसंच नियुक्तींमध्ये लोकशाही मूल्यांचं पालन झालं नाही, असा दावा अजित पवार गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. याप्रकरणी पुढची सुनावणी 9 नोव्हेंबरला होणार आहे, त्यावेळी शरद पवार गटाचा युक्तीवाद सुरू होईल, अशी माहिती शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली.

**टपाल सप्ताह-पाठक-राजेंद्र**

जागतिक टपाल दिन काल देशभरात सर्वत्र साजरा करण्यात आला. टपाल खात्यातर्फे कालपासून राष्ट्रीय टपाल सप्ताह देखील साजरा केला जात आहे. यानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती पुणे विभागाचे पोस्ट मास्तर जनरल - रामचंद्र जायभाय यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. पुणे टपाल विभागातर्फे टपाल निर्यात केंद्रांची संख्या वाढवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी बोलताना रामचंद्र जायभाय म्हणाले . . .

**राष्ट्रीय डाक सप्ताह सुरु होत आहे, यामध्ये आपण वेगवेगळे उपक्रम करणार आहोत , जसं वित्तीय सशक्तीकरणा साठी त्यामध्ये आपण , सुकन्या खात असेल किंवा जेष्ठ नागरिकांचे खाते असेल किंवा मंथली इन्कम स्कील यांसारखे खाते आपण उघडणार आहोत , आणि महिला सन्मान सेवा साठी जी योजना आहे ती लोकांपर्यंत आपण पोहचवणार आहोत त्यानंतर मेल आणि पार्सल डे जो आहे, त्यामध्ये कस्टमर साठी कस्टमर मीट आपण योजणार आहोत , त्यातून त्यांचा अभिप्राय घेऊन , त्यात सुधारणा करणार आहोत . आणि शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना आणि जीवन ज्योती बिमा योजना यांसारख्या योजना लोकांपर्यंत पोहचवणार आहोत.**

**शेतमालात घट-भूषण-राजेंद्र**

मोसमी पावसाच्या हंगामात राज्यातील 36 पैकी 24 जिल्ह्यांत अपेक्षित पाऊस झाला नसल्यानं या ठिकाणी खरीप हंगामातील उत्पादनात - घट होण्याची शक्यता आहे.कृषी विभागाचे मुख्य सांख्यिक - विनय कुमार आवटे यांनी काल ही माहिती दिली.

**हेरंब कुलकर्णी-भावसार-राजेंद्र**

ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत हेरंब कुलकर्णी यांच्यावर अहमदनगर इथे झालेल्या हल्लाप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. त्यातील एक व्यक्ति अल्पवयीन असून आणखी दोन आरोपी फरार आहेत. शाळेजवळील पानटपरी हटवल्याच्या कारणातून हा हल्ला केल्याची माहिती आरोपींनी पोलिसांना दिली आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कुलकर्णी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

**रामलीला-मुंबईएक्स**

दसरा आणि नवरात्रोत्सव काळात मुंबईसह परिसरात – राज्य सरकारच्या नेतृत्वाखाली रामलीला कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार असल्याचं मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी समाजमाध्यमाद्वारे सांगितलं आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र रामलीला मंडळाच्या प्रतिनिधींबरोबर लोढा यांची बैठक झाली होती. त्या बैठकीत मुंबईत रामलीला कार्यक्रमाच्या आयोजनासंदर्भात मुंबई महापालिकेला त्यांनी काही निर्देश दिले होते. त्यानुसार रामलीला कार्यक्रमासाठी एक खिडकी योजना तयार केली आहे. त्याचप्रमाणे मैदानाच्या भाड्यामध्ये 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय देखील घेतला आहे.

**मुंबई- पुणे द्रुतगती –भावसार-राजेंद्र**

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर अमृतांजन पुल ते खंडाळा बोगदा - या दरम्यान - सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी कमानी उभारण्याचं काम आज केलं जाणार आहे. त्यामुळे मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक आज दुपारी 12 ते 2 या वेळेत पूर्णपणे बंद राहणार असल्याचं राज्य रस्ते विकास महामंडळानं कळवलं आहे. दुपारी 2 नंतर पुण्याकडे जाणारी वाहतूक पूर्ववत सुरु केली जाईल.

**रेल्वे मेगा ब्लॉक – कोनकर-राजेंद्र**

रत्नागिरीच्या संगमेश्वर तालुक्यातल्या कडवईपासून रत्नागिरीपर्यंतच्या रेल्वेमार्गावर आज सकाळी 7 वाजून 40 मिनिटांपासून 3 तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार

**हवामान**

मान्सूननं राज्याच्या बहुतांश भागातून माघार घेतल्याची माहिती हवामान विभागानं काल दिली. तसंच येत्या 24 तासात राज्यात हवामान कोरडं राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार**...